**CNR No.MHSI01000868-2023**

## निशाणी १३ खालील आदेश

अपिलकार यांनी सदरचा अर्ज आदेश ४१ नियम २७ दिवाणी पक्रिया संहितानुसार पुरावा हजर करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर कामामध्ये सामनेवाला गैरहजर आहेत. अपिलकार यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अपिलकार यांचे अर्जामध्ये कथन की, ते दावा मिळकती संबंधी शासकिय कागदपत्रे हजर करत आहेत. सदर कागदपत्रे ही मुळ दावा व अपिलाचा गुणदोषावर निकाल करण्यासाठी आवश्यक आहेत. सदर कागदपत्रे ही दावा चालू असतांना प्राप्त झालेली नव्हती. त्या कागदपत्रांचा शोध घेतला असता ती मिळून आली नव्हती. परंतु आता कागदपत्रे उपलब्ध झालेली आहेत. ती सार्वजनिक दस्तऐवज आहेत. ती कागदपत्रे न्यायदानासाठी अत्यंत आवश्यक आहेत. त्यामुळे जादा पुरावा देण्याची परवानगी मिळावी.

३. अपिलकार यांचा अर्ज, त्यातील अर्जाचे कारण व संबंधीत तरतुदीचा विचार करता असे दिसून येत आहे की, अपिलकार दाखल करत असलेली कागदपत्रे ही दावा मिळकतीशी संबंधीत असून अपिलकार यांनी त्या कागदपत्रांची शोधाशोध करुन हजर केलेली आहेत. सबब, याठिकाणी अपिलकार यांनी दिलेले कारण पाहता ते कारण योग्य व संयुक्तिक दिसून येते. सदर कागदपत्रे ही अपिलाचा निकाल करण्यासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे या वरील कारणास्तव मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपिलकार यांचा निशाणी १३ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अपिलकार यांना अर्जासोबत दाखल केलेला कागदोपत्री पुरावा हजर करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2026.01.08 11:03:57 +0530

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– ०७/०१/२०२६

(श्री.एस.एस.इंदलकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग–ओरोस.